# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला (दक्षिण कक्ष), बेलापुर, नवी मुंबई- ४००६१४
दुरध्वनी : ०२२ - २७५७०१६६ /२७५७१६७३ फॅक्स : ०२२ - २७५७०९६९

---

## सविस्तर सूचना क्र.१, सन-२०२३-२४

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्यवर्ती कार्यालय, नवी मुंबई येथील "कार्यासन अधिकारी/अधीक्षक" या संवर्गातील २ पदे म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कार्यासन अधिकारी/अधीक्षक यांचेमधुन सेवा करार पध्दतीने भरणेचे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने खालील नमुद केलेल्या अटी व शर्ती पुर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

सदर अर्ज १६ जुलै, २०२४ पर्यंत मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, नवी मुंबई -४००६१४ या पत्त्यावर पाठवावेत.

**मानधन** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २७१५/प्र.क्र.१०० (भाग-१)/१३, दिनांक ८/९/२०२३ नुसार अदा करण्यात येईल.

**अटी व शर्ती :**

१) सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येणाऱ्या संबंधीतास कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ ते संध्याकाळी ६.१५) कार्यालयात उपस्थित रहावे लागेल.

२) सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येणाऱ्या संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

३) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा उमेदवारांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

४) सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

५) सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहिल.

६) सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

७) सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम अधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन मुल्यमापन करतील.

८) प्राप्त अर्जाची नामिकासूची तयार करणेत येईल व प्राधिकरणाने सदर उमेदवार निवडीसाठी नेमलेल्या निवड समिती मार्फत उमेदवारांची निवड करणे येईल. याबाबतीत नियुक्ती प्राधिकारी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा निर्णय अंतिम असेल.

(दिपाली देशपांडे-सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**संक्षिप्त जाहिरात सुचना क्र. १ सन-२०२४-२५**

म.जी.प्रा.मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई येथील "कार्यासन अधिकारी/अधीक्षक" या संवर्गातील २ पदे म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कार्यासन अधिकारी/अधीक्षक यांचेमधुन सेवा करार पध्दतीने भरावयाचे आहे. याबाबतचा सविस्तर तपशिल https://mjp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-

मुख्य प्रशासकीय अधिकारी

MAHARASHTRA JEEVAN PRADHIKARAN

Short advertisement Notic No. 1 for 2024-25

M.J.P. invites application of eligible candidates for the Post of Section Officer/Office Superintendent" for limited work on contract basis at CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai. detailed terms and conditions are available on website,

https://mjp.maharashtra.gov.in

Sd

Chief Administrative Officer